महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
कामगार विभाग,२रा मजला,
बांद्रे (पू.), मुंबई- ४०० ०५१.
संदर्भ क्र. कामगार/ब/ककनि/२२८८७
दिनांक : ३१.०७.२००४

# परिपत्रक

विषय : कर्मचारी कल्याण निधीमध्ये वाढ करण्यासाठी कर्मचा-यांच्या वेतनातून दरमहा रु. ३/- (रु. तीन मात्र) कपात करणेबाबत.

**************

मंडळातील कर्मचा-यांच्या अवलंबितासाठी कर्मचारी कल्याण निधी समितीतर्फे निरनिराळया कल्याणकारी योजना राबविल्या जातात. अशा कल्याणकारी योजना राबविताना कर्मचारी कल्याण निधी मध्ये असलेला निधी अपुरा पडतो असे समितीच्या निदर्शनास आले असता या निधीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे असे कर्मचारी कल्याण निधी समितीच्या सदस्यांनी मत व्यक्त केले. त्यानुसार असा निर्णय घेण्यात आला की या निधीमध्ये वाढ करण्यासाठी कर्मचा-यांच्या पगारातून दरमहा रु. ३/- (रु. तीन मात्र) कपात करण्यासाठी मंडळातील कर्मचारी संघटनांचा होकार घेऊन त्याप्रमाणे कर्मचा-यांच्या पगारातून दरमहा रु. ३/- (रु. तीन मात्र) कपात करुन या निधीमध्ये जमा करण्यात यावा.

क.क.नि.स.च्या वरील निर्णयानुसार मंडळाच्या अध्यक्षांच्या परवानगीने सर्व संघटनांना कळविण्यात आले होते व त्यानुसार सदर संघटनांनी दरमहा रु. ३/- (रु. तीन मात्र) कपात करण्यास लेखी होकार कळविला आहे. त्यानुसार मुख्य कार्यालयातील व क्षेत्रीय कार्यालयातील सर्व संबंधीत अधिका-यांना कळविण्यात येते की त्यांनी कर्मचा-यांच्या पगारातून दरमहा रु. ३/- (रु. तीन मात्र) कपात करावी. अशी कपात केलेली रक्कम मुख्य लेखा अधिकारी (मंडळ लेखा), मुंबई यांचे परिपत्रक क्र २३० मध्ये नमूद केलेल्या ६४४३३२ या लेखासंहिता (Account Code) खाली जमा करावी. सदरचे परिपत्रक उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. ही कपात सप्टेंबर २००४ च्या महिन्यापासून नियमितपणे कपात करण्यात यावी.

सचिव, म.रा.वि.मंडळ व
अध्यक्ष, क.क.नि.समिती

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रती : प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

D:\kura B on\kai\das m3 vr4.doc